# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३४८०**

**अपिलार्थी श्री. ॲड. प्रशांत दिवटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
एच. आर. कॉलेज, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
एच. आर. कॉलेज, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०८.२०२४ | ०२.०९.२०२४ | १०.०९.२०२४ | २२.१०.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २८.११.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०२.०९.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.१०.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०३.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "H. R. कॉलेज, चर्चगेट, मुंबई या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या डिपॉझिटची माहितीची साक्षांकित व छायांकित प्रत.*
*(२) सदर कॉलेजने परतफेड करण्यासाठी घेतलेल्या सर्व ठेवी किंवा डिपॉझिट रकमेची क्लासनुसार माहिती.*
*(३) सदर कॉलेजने परतफेड करण्यासाठी घेतलेल्या रक्कम परत केल्या का यासंबंधीत माहिती."*

२. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०९.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, It has been observed that the RTI Application seems to be aimed at pressuring the College for the admission of ineligible students, as recommended by you in your capacity as President of Rashtrawadi Vidyarthi Congress. It is important to note that the RTI Act is intended to facilitate transparency and accountability in public authorities and is not meant for personal or undue influence. The Fees Receipts issued to students list the name of the student, the course, a unique ID number, and details of the refundable deposit under the

..२/-

Fees Head. Refundable deposits that are not claimed by students are recorded as liabilities in the Balance Sheet. Beyond this, the institution does not maintain separate records for refundable deposits.

३. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १०.०९.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१०.२०२४ रोजी The Respondent maintained that the RTI application was adequately addressed, with explanations provided in the response. She argued that the assertion of "hidden information" stems from the Appellant's expectations rather than a lack of transparency in the response. The Respondent further submits the Fee Receipt issued to the student's shows, inter-alia, the name of the Student, Course and Unique ID No. and Refundable Deposit under fees head. Refundable deposits are shown as liabilities in the Balance Sheet. Apart from this, no record is maintained in the College regarding refundable deposits. Based on the Respondent's submissions and the provided reply, I concur that the "hidden information" claim is unfounded. Furthermore, the RTI requests do not demonstrate sufficient public interest to warrant further scrutiny. I further concur that the information sought is reflected in the Fee Receipt issued to the student and Refundable Deposit under Fees Head. Refundable deposits are shown as liabilities in the Balance Sheet, and the Balance Sheet is the personal and confidential information of the College exempted from disclosure असे नमुद करुन अपील निकाली काढलेले आहे.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तसेच त्यांचे अधिवक्ता उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्याकडे अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. जेव्हा की, विद्यार्थ्यांकडून डिपॉझिट घेतले जाते व विद्यार्थ्यांना परत न करता सदर रक्कम महाविद्यालयात वेगळे कामासाठी वापरली जाते.

५. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०४.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींनी सादर केली तशी वस्तुस्थिती नाही. जरी संबंधीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने डिपॉझिट परत घेतले नाही तरी बॅलन्स शीटमध्ये सदर रक्कम Liability म्हणून दाखविली जाते व जेव्हा केव्हा विद्यार्थ्यांनी मागणी केली तेव्हा सदर रक्कम परत दिले जाते. तसेच त्यांचे लेखा अहवाल वैयक्तिक व गोपनीय असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. अपिलार्थींना माहिती अर्जाच्या अनुषंगाने स्पष्ट कळविले आहे की, शुल्क पावतीवर विद्यार्थ्यांचे नाव, कोर्स, आयडी क्रमांक व इतर माहिती उपलब्ध असते व अशी माहिती अपिलार्थींना माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांनी याच विषयावर उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे माहिती अर्ज सादर केलेला आहे.

..३/-

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही सादर केले की, अपिलार्थींनी जुलै महिन्यात एक विद्यार्थ्याचे F.Y.B.A. मध्ये प्रवेशासाठी विनंती केली होती. सदर विद्यार्थ्याचे गुण ८६.१७% होते. जेव्हा की, सदर अभ्यासक्रमासाठी कटऑफ ९२% होता. या कारणामुळे संबंधीत विद्यार्थ्यास प्रवेश न दिल्याने महाविद्यावर दबावासाठी अपिलार्थी माहिती अर्जांतर्गत माहिती मागत आहेत.

७. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**